माहितीचा अधिकार

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ :- ६७०९/२०२३/सोलापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| व्ही. एस. शेंडे | नायब तहसीलदार महसूल, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | तहसीलदार महसूल, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर |

**( सुनावणी दिनांक - २१/०७ /२०२५ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि.०३.११.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान तथा तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी यांनी दि.०६.०६.२०२३ च्या माहिती अर्जात शासकिय माहिती मिळण्यासाठी शासनेतर अधिकारी आणि शासनेतर संस्थांकडून मिळण्याची पध्दत आणि याबाबतचे संबंधित शासन निर्णय, परिपत्रके,सूचना इ.बाबत १ ते ५ मुद्यांची माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, “माहिती दिली नाही.”

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, “जन माहिती अधिकारी यांनी बँकेकडे अर्ज वर्ग केला आहे परंतु त्यावर काहीही कार्यवाही केली नाही.”

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान अवगत केले की, “अपिलार्थी यांचे प्रथम अपिल अर्ज दि.२५.१०.२०२३ रोजीच्या पत्राने प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सोलापूर यांचेकडे वर्ग केले आहे.”

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, विदर्भ कोकण ग्रामीण बँक सोलापूर यांनी अपिलार्थी यांना दि.०४.०५.२०२३ च्या पत्राने अपिलार्थी यांनी यापूर्वी बँकेकडून पीक कर्ज घेतले असून ते मुदतीत भरणा केलेले नसल्यामुळे ते बँकेचे थकबाकीदार आहेत त्यामुळे त्यांना नियमाप्रमाणे कर्ज देता येत नाही असे कळविले होते. तसेच जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रीय व्यवस्थापक सोलापूर यांनी दि.२५.०७.२०२३ च्या पत्राने उत्तर दिले आहे. अपिलार्थी यांनी सदरचे पत्र प्राप्त झालेचे आयोगासमोर मान्य केले.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुतचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

जावक क्र. ६७०९/२०२३/ सोलापूर 4534/2025 दिनांक - 13/10/25

.